जा.क्र.आस्था-३(१)/पो.भ.-१८/नियुक्ती आदेश क्र.-११/२०१९,
पोलीस आयुक्त, पुणे शहर यांचे कार्यालय,पुणे
दिनांक २९/३/२०१९.

संदर्भ:- महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११

विषय:- पोलीस भरती-२०१८.

पोलीस शिपाई / चालक पोलीस शिपाई पदावर स्थानिक व तात्पुरत्या स्वरुपात नेमणुकीबाबत...

---ooo---

## नियुक्ती आदेश :-

पुणे शहर पोलीस घटकांत रिक्त असलेल्या/होणा-या पोलीस शिपाई पदाकरीता पोलीस भरती प्रक्रिया दिनांक १२/०३/२०१८ ते १७/०४/२०१८ या कालावधीत पार पडली. सदर पोलीस भरती दरम्यान मैदानी चाचणी व लेखी परीक्षेत गुणानुक्रम,सामाजिक व समांतर आरक्षणानुसार खालील नमुद उमेदवारांची पोलीस शिपाई पदासाठी निवड झालेली आहे. तद्नंतर सदर उमेदवार वैद्यकिय तपासणी व चारित्र्य पडताळणी मध्ये पोलीस शिपाई पदावर नियुक्तीसाठी पात्र ठरलेले आहेत.

त्याअनुषंगाने खालील उमेदवार यांना पुणे शहर पोलीस घटकाचे आस्थापनेवर **"पोलीस शिपाई/चालक पोलीस शिपाई (गट-क)"** या संवर्गात वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० +२००० ग्रेड पे (अधिक रुपये ५००/- विशेष वेतन) यामध्ये मुळवेतन रुपये ६४६०+२००० ग्रेड पे + ५०० विशेष वेतन या वेतनावर पोलीस मुख्यालय,शिवाजीनगर,पुणे शहर येथे दिनांक ०१/०४/२०१९ पासून खाली नमूद केलेल्या अटी व शर्तीचे अधीन राहुन अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त करण्यांत येत आहे.

| अ.क्र | चेस्ट नं. | उमेदवारांची नावे | पु/स्त्री | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | समांतर आरक्षण | एकुण गुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 21785 | KHUMAN RAJYA PATLE | M | ST | ST | SPORTSMAN | 126 |
| 2. | 22213 | CHANDRAKANT MARUTI PAWAR | M | OPEN | OPEN | EXMAN | 146 |
| 3. | 18389 | DINESH HANUMANT BHOSALE | M | OPEN | OPEN | HOMEGUARD | 145 |
| 4. | 6048 | TUSHAR HANUMANT GIRANGE | M | ST | ST | - | 150 |
| 5. | 13243 | DNYANESHWAR RAMESHWAR SAWAKE | M | OBC | OBC | - | 164 |
| 6. | 19373 | DNYANESHWAR AJINATH KALOKHE | M | OBC | OBC | - | 164 |

## अटी व शर्ती खालील प्रमाणे :-

१. सदरची नियुक्ती ही अस्थायी व निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

२. महाराष्ट्र शासन,सा.प्र.वि.,शा.नि.क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब,दि.१२-१२-२०११ नुसार जात प्रमाणपत्राची वैधता तपासण्याचे अधीन राहुन निव्वळ तात्पुरती नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

३. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर आपण नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. आपण नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबंधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोहच पावतीची साक्षांकित प्रत या कार्यालयास सादर करावी. मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार संबंधीत जात पडताळणी समितीन उमेदवाराचे पडताळणीचे प्रस्ताव ६ महिन्याचे आंत निकाली काढावेत. जात पडताळणी समितीने आपले जात प्रमाणपत्र अवैध ठरविले तर तुम्हांस दिलेला नियुक्ती आदेश त्वरीत रद्द करण्यांत येईल व तुमच्या विरुध्द महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती,विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम,२००० यातील तरतूदीनुसार तुमच्या विरुध्द त्वरीत कारवाई करण्यांत येईल.

४. याचिका क्र.२१३६/२०११ व अन्य याचिकावर मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाने दिनांक २५-०८-२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालय,दिल्ली येथे एसएलपी दाखल करण्यांत आली आहे. यावर मा.सर्वोच्च न्यायालयाकडून जे काही आदेश दिले जातील त्या आदेशाच्या अधीन राहून सदर नियुक्ती आदेश राहील.

५. पोलीस शिपाई पदावर तात्पुरत्या व अस्थायी स्वरुपात नियुक्ती दिल्यानंतर भविष्यांत चारित्र्य पडताळणी अहवाला संदर्भात प्रतिकुल फेरअहवाल प्राप्त झाल्यास, संबंधीत उमेदवारांची सेवा तात्काळ समाप्त करण्यांत येईल.

६. प्रशिक्षण कालावधीत नियुक्ती दिलेल्या नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना दुखापत झाल्यास, त्याबद्दल ते कोणत्याही प्रकारच्या नुकसान भरपाईस पात्र राहणार नाहीत.